नवी मुंबई महानगरपालिका

मा.प्रशासक तथा आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका

मंगळवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२० रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि. १३ ऑक्टोबर, २०२० | कोरोना COVID-२०१९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात जंतुनाशक फवारणीकरिता मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक १२/१०/२०२०, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/घकव्य/८५३/२०२०. |
| ठराव क्र.२७० | "उपरोक्त संदर्भात कोरोना COVID-२०१९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात जंतुनाशक फवारणीकरिता मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. विकास कन्स्ट्रक्शन यांची निविदा रक्कम रु.३४,३४,६५९/- (अक्षरी रु.चौतीस लक्ष चौतीस हजार सहाशे एकोणसाठ मात्र) स्विकृत करण्यास तसेच सदर कामासाठी वाढीव मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास व कालावधी वाढल्यास वाढीव कालावधीसाठी संबधित कंत्राटदाराचे मंजुर दराने कामे करुन घेण्यास व त्याचा सोबत करारनामा करण्यास व होणाऱ्या खर्चाची प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३ (क) अन्वये मान्यता दिली असून, या विषयीचे प्रतिवृत्त यास मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोरोना COVID-२०१९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात जंतुनाशक फवारणीकरिता मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक २७० अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे कोरोना COVID-२०१९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात जंतुनाशक फवारणीकरिता मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे. विकास कन्स्ट्रक्शन यांची निविदा रक्कम रु.३४,३४,६५९/- (अक्षरी रु.चौतीस लक्ष चौतीस हजार सहाशे एकोणसाठ मात्र) स्विकृत करण्यास तसेच सदर कामासाठी वाढीव मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास व कालावधी वाढल्यास वाढीव कालावधीसाठी संबधित कंत्राटदाराचे मंजुर दराने कामे करुन घेण्यास व त्याचा सोबत करारनामा करण्यास व होणाऱ्या खर्चाची प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३ (क) अन्वये मान्यता दिली असून, या विषयीचे प्रतिवृत्त यास मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

सही/-
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**